नि. फौ. ख. क्र. १५/२०१८ निशाणी क्र. २६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – राष्ट्रपाल गणेश मानकर

वय – ३३ वर्षे व्यवसाय – धाब्या वरील आचारी

पत्ता – मांडोली, ता. बाळापुर जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री. के.एस. ताकवाले यांचा सरतपास**

१. मी आरोपींना ओळखत नाही. दि. ३१.१२.२०१७ रोजी पारस फाटा वरील शर्मा धाब्यावर मी आचारी म्हणुन काम करीत होतो. सदर धाबा मांडोली गावाचे रहिवासी चंदु होनाळे हे चालवित होते. घटनेच्या वेळी मी भट्टी मध्ये काम करीत होतो त्यामुळे बाहेर काय झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीला फायबर च्या पाईपाने मारहाण केली होती.

**(सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे उलट तपासणीत विचारले जाणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतल्यामुळे तशी परवानगी देण्यात आली.)**

२. दि. ३१.१२.२०१७ रोजी रात्री ३ ते ३:३० वाजता फिर्यादी ट्रक डायव्हर गोविंदसिंग आणि त्यांच्या सोबत जगदीश सिंग हे दोघे धाब्यात पळत आले होते किंवा नाही हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, एक स्कॉपीओ गाडी धाब्याजवळ आली त्यातुन आरोपी क्र.१ ते ३ हे उतरले आणि ट्रक ड्रायव्हर गोविंदसिंग यांना तु आमच्या गाडीला साईड का दिली नाही असे म्हणुन लाथा बुक्कयानी मारहाण केली किंवा नाही हे मला माहित नाही. आरोपी क्र.१ हे ड्रायव्हर ला फायबर च्या पाईपने मारत असतांना इतर दोन आरोपी असे म्हणत होते की, बंड्डु याला मार तु याबाबत मला माहिती नाही. हे मला माहित नाही की, त्या ठिकाणी पोलिस आले व भांडण सोडवले आणि ते आरोपींना घेवुन गेले.

३. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी खोटा पुरावा देत आहे.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. पी.आर. पटोकार</u>

हे म्हणणे बरोबर आहे की, चंदु होनाळे यांच्या मालकीच्या धाब्या समोर ट्रक उभे राहण्यासाठी मोकळी जागा नसल्यामुळे तेथे ट्रक उभे राहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशी कोणतीही घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

दिनांक : १२/०२/२०२४.
ठिकाणः बाळापूर

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

स्वा/-
( विष्णु द. गिते )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),बाळापूर.

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 12/02/2024 |
| Order signed by P.O on | :- | 12/02/2024 |
| Order uploaded on | :- | 12/02/2024 |